सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी प्रधानमंत्री मातृ वंदना या योजनेचा अंमलबजावणीसाठी तिसऱ्या हप्त्याचा (Partial Payment) हिश्याचा ४०% निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रमावं-२०१८/प्र.क्र.२६४/कु.क.

गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला, ए विंग,
मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई
तारीख: ३० मार्च, २०१९

वाचा -

१) **अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे जा. क्रमांकः राकुकका/PMMVY/७१/२०४४३-४५/१९,दि. मार्च,२०१९. चे पत्र.**
२) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन ज्ञापन क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.९६/अर्थसंकल्प, दि.१०.०४.२०१८**
३) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः प्रमावं-२०१८/२६४/ कु.क., दि.१८.२.२०१९**
४) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः प्रमावं-२०१८/२६४/ कु.क., दि.१५.३.२०१९**
५) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः प्रमावं-२०१८/२६४/ कु.क., दि.२९.३.२०१९**
६) **केंद्र शासनाचे पत्र क्रमांकः १५/२८/२०१७- PMMVY, दि.२६.३.२०१९ व दि.२७.३.२०१९ चे २ आदेश**

प्रस्तावना -

प्रधानमंत्री मातृ वंदना ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या सहभागातून राज्यात राबविण्यात येत असून यामध्ये केंद्र शासनाचा ६० % व राज्य शासनाचा ४० % आर्थिक सहभाग आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीसाठी सर्वसाधारण घटकासाठी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्याचा (Partial Payment) प्राप्त झालेला निधी संदर्भिय शासन निर्णय क्र.३ ४ व ५ अन्वये वितरित करण्यात आला आहे. संदर्भिय क्र.६ च्या आदेशान्वये तिसऱ्या हप्त्याचा (Partial Payment) रु.२१,७६,०५,१०८/- (रुपये एकवीस कोटी शहात्तर लक्ष पाच हजार एकशे आठ फक्त) एवढा निधी प्राप्त झाला आहे. (या मध्ये सर्व साधारण घटकासाठी रु.१८,०९,००,०००/-व अनुसुचित जाती या घटकासाठी रु. ३,६७,०५,१०८/- चा समावेश आहे.) सदर निधी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे नावे उघडण्यात आलेल्या Escrow Account मध्ये थेट केंद्र शासनाकडून जमा झाला आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकरीता सन २०१८-१९ मधील राज्य हिस्सा ४० % प्रमाणे रक्कम रु.६५.०० कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या सन २०१८-१९ च्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता सर्वसाधारण घटकांतर्गत राज्य हिश्शाची रक्कम (४० %) Escrow Account मध्ये वर्ग करण्यासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सर्वसाधारण घटकासाठी उपलब्ध करुन दिलेल्या रु.१८,०९,००,०००/-(रुपये अठरा कोटी नऊ लक्ष फक्त) एवढया (६० %) केंद्र हिश्याच्या अनुरुप राज्य हिश्याचा ४०% प्रमाणे रु.१२,०६,००,०००/- (रुपये बारा कोटी सहा लक्ष फक्त) एवढा निधी सर्वसाधारण घटकाकरीता वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी कोषागारात देयक सादर करुन राज्य हिश्यापोटी आवश्यक असलेला ४०% एवढा निधी प्राप्त करुन घेऊन आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या नावे उघडण्यात आलेल्या Escrow Account मध्ये जमा करण्याची कार्यवाही करावी. यासाठी सह संचालक (अर्थ व प्रशासन) आरोग्य सेवा, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन ज्ञापन क्र.अर्थसं-२०१८/ प्र.क्र.९६/ अर्थसंकल्प, दि.१०.४.२०१८ मधील तरतूदीनुसार सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी मंजुर केलेला रु.१२,०६,००,०००/- (रुपये बारा कोटी सहा लक्ष फक्त) एवढा निधी "मागणी क्रमांक आर-१,२२११-कुटुंब कल्याण (००) १०३ माता व बाल आरोग्य, (०२) प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व सहयोग कार्यक्रम, (०२)(०१) प्रधानमंत्री मातृवंदना योजना, (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम) (२२११ १३८८), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतुन खर्च करण्यात यावा.

सदरील खर्च हा सशर्त असून केलेल्या खर्चाचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रामणपत्र व योजनेच्या प्रगतीचा अहवाल केंद्र व राज्य शासनास विहित प्रपत्रात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी पाठविण्यात यावा. तसेच सदरील निधी हा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात यावा. प्रधानमंत्री मातृ वंदना या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी प्राप्त झालेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता संबंधित कार्यालयाने घ्यावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थस-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२.४.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१४४३०७४३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.03.30 15:42:51 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र - ½ (लेखापरीक्षा/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
७. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय-१३/अर्थसंकल्प-९), मंत्रालय, मुंबई.
१०. सार्वजनिक आरोग्य विभाग, (अर्थसंकल्प/लेखा) मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती (कु.क.)